# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 10 December 2024

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १० डिसेंबर २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- विमा सखी योजनेचं पंतप्रधानांच्या हस्ते अनावरण–महिला सशक्तीकरणाच्या दिशेनं महत्त्वाचं पाऊल असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन.
- रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरपदी संजय मल्होत्रा यांची नियुक्ती.
- विधीज्ञ राहुल नार्वेकर यांची विधानसभा अध्यक्षपदी बिनविरोध निवड–राज्यसरकारचा विश्वासदर्शक ठराव आवाजी मतदानानं मंजूर.
- विशेष अधिवेशनाचं कामकाज संस्थगित–हिवाळी अधिवेशन येत्या १६ डिसेंबरपासून नागपूर इथं घेण्याची राज्यपालांना शिफारस.

आणि

- लाडकी बहीण योजनेच्या छाननीबाबतचं वृत्त निराधार असल्याचं माजी मंत्री आदिती तटकरे यांच्याकडून स्पष्ट.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते काल 'विमा सखी योजने'चं अनावरण करण्यात आलं. हरियाणात पानिपत इथं काल झालेल्या कार्यक्रमात पंतप्रधानांनी, भावी विमा सख्यांना प्रमाणपत्रं प्रदान केली. एलआयसी–भारतीय जीवन विमा महामंडळाच्या या योजनेचा उद्देश, महिलांना आर्थिक स्वातंत्र्य प्रदान करणं हा आहे. ही योजना म्हणजे, महिला सशक्तीकरणाच्या दिशेनं टाकलेलं महत्त्वाचं पाऊल असल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं.

या योजनेअंतर्गत १८ ते ७० वयोगटातल्या किमान दहावी उत्तीर्ण असलेल्या महिलांना, एलआयसी प्रतिनिधी बनण्यासाठी प्रशिक्षित करण्यात येईल. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी या योजनेबाबत बोलतांना, पुढच्या तीन वर्षांत

किमान दोन लाख महिलांना या योजनेत समाविष्ट करून घेतलं जाणार असल्याची माहिती दिली. या महिलांना पहिली तीन वर्षं दरमहा विद्यावेतनासह त्यांनी काढलेल्या विमा पॉलिसींचं कमिशनही देण्यात येणार असल्याचं सीतारामन यांनी सांगितलं. त्या म्हणाल्या...

***दसवीं पास की हुई महिलाओं कों एलआयसी रिक्रुटमेंटद्वारा बिमासखी नाम से उन्हे रिक्रुट करते हुये, उनको एक स्टाइपेंड भी देंगे। पहिले साल हर महिना 7 हजार रुपये फिर अगले साल हर महिना 6 हजार रुपया होते हुये तिसरे साल हर महिने 5 हजार रुपये मिलेगा. ये सिर्फ बेसीक स्टायपेंड है। इसके उपर महिला उनके अपने अपने कमिशन भी कमा सकते हैं।***

****

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरपदी संजय मल्होत्रा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संजय मल्होत्रा भारतीय प्रशासकीय सेवेतले राजस्थान क्षेत्रातले १९९० सालचे अधिकारी असून सध्या ते अर्थमंत्रालयात महसूल सचिव पदावर कार्यरत आहेत. पुढच्या तीन वर्षांसाठी मल्होत्रा यांची ही नियुक्ती असेल, उद्या ११ तारखेला ते आपला पदभार स्वीकारतील. विद्यमान गव्हर्नर शक्तिकांत दास यांचा कार्यकाळ आज संपणार आहे.

****

एक ट्रिलीयन अमेरिकी डॉलर्स अर्थव्यवस्थेचं उद्दीष्ट गाठण्याकडे महाराष्ट्राची घोडदौड सुरू असल्याचं  राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे. ते काल विधीमंडळाच्या विशेष अधिवेशनाच्या संयुक्त सभेसमोर अभिभाषण करत होते. चालू वर्षाच्या पहिल्या दोन तिमाहीत थेट परकीय गुंतवणुकीत देशभरात महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर असल्याचं त्यांनी सांगितलं. गेल्या वर्षातही थेट परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र देशभरात अग्रेसर होता, याकडे राज्यपालांनी लक्ष वेधलं.

****

राज्य विधानसभेच्या अध्यक्षपदी भाजपचे राहुल नार्वेकर यांची बिनविरोध निवड झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांनी नार्वेकर यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला, त्याला इतर सदस्यांनी अनुमोदन दिलं. त्यानंतर नार्वेकर यांची अध्यक्षपदी निवड झाल्याची घोषणा हंगामी अध्यक्ष कालिदास कोळंबकर यांनी केली. मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यासह काँग्रेसचे नाना पटोले आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र

पवार पक्षाचे जयंत पाटील यांनी नार्वेकर यांचं अभिनंदन करुन त्यांच्या कार्याचा गौरव केला.

अध्यक्ष निवडीच्या या प्रक्रियेवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं बहिष्कार टाकला होता. आमदार आदित्य ठाकरे यांनी यासंदर्भात सदनाबाहेर पत्रकारांशी बोलतांना, विधानसभा अध्यक्षांकडून सर्वांना समान न्याय मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालच्या महायुती सरकारचा विश्वासदर्शक ठराव सदस्य उदय सामंत, दिलीप वळसे पाटील, संजय कुटे आणि रवी राणा यांनी सभागृहात मांडला, तो आवाजी मतदानाने मंजूर झाला.

****

ज्येष्ठ उद्योजक रतन टाटा यांच्यासह विधीमंडळाचे दिवंगत सदस्य मधुकर पिचड, रोहिदास पाटील, बाबा सिद्धीकी, वसंत चव्हाण, यांच्यासह इतर दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठीचा शोकप्रस्ताव अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी काल मांडला, सर्व सदस्यांनी दोन मिनिटं स्तब्ध राहून सर्व दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

त्यानंतर राज्यपालांच्या सूचनेनुसार विधानसभेच्या विशेष अधिवेशनाचं कामकाज संस्थगित करण्यात येत असल्याची घोषणा अध्यक्ष नार्वेकर यांनी केली. विधीमंडळाचं हिवाळी अधिवेशन येत्या १६ डिसेंबरपासून नागपूर इथं घेण्याची शिफारस राज्यपालांना करण्यात आल्याची माहिती नार्वेकर यांनी यावेळी दिली.

****

सीमाभागातल्या मराठी भाषिकांच्या पाठीशी महाराष्ट्र विधानमंडळ ठामपणे उभे असून, बेळगाव, निपाणीसह संयुक्त महाराष्ट्र होत नाही तोवर आमचा लढा सुरूच राहणार असल्याचा निर्धार, मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला आहे. ते काल विधान परिषदेत बोलत होते. मराठी माणसांनी मेळावे घेऊ नयेत, अशी कर्नाटक सरकारने घेतलेली भूमिका घटनात्मक अधिकारांचं उल्लंघन करणारी असल्याचं, त्यांनी नमूद केलं.

काल विधानपरिषदेत विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी हा मुद्दा उपस्थित केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावर बोलतांना, कर्नाटक सरकारच्या या कृतीचा महाराष्ट्र सरकार तीव्र शब्दात निषेध करत असल्याचं सांगितलं. सदनाबाहेर पत्रकारांशी बोलतांना त्यांनी आपली भूमिका मांडली..

***कर्नाटक सरकारने दडपशाही केली. आणि म्हणून मी याचा जाहीर निषेध करतो.धिक्कार करतो.आणि वरिष्ठ सभागृहात सरकारची भूमिका आणि शिवसेना पक्षाची भूमिका मी मांडली.मुख्यमंत्री महोदयांनी देखील सरकारची भूमिका मांडलेली आहे. ही भुमीका एकच आहे. कर्नाटकमधील मराठी भाषिकांच्या पाठीशी महाष्ट्रातील साडेबारा कोटी जनता खंबीरपणे उभी आहे. आणि सर्वोच्च न्यायालयात जे प्रकरण सुरु आहे. यासाठी देखील महाराष्ट्र सरकारच्या वतीने अनेक तज्ञ वकीलांची फौज काम करत आहे.***

बेळगाव इथं महाराष्ट्र एकीकरण समितीने आयोजित केलेल्या मराठी भाषिकांच्या महामेळाव्याला कर्नाटक सरकारने परवानगी दिली नाही. महाराष्ट्र एकीकरण समितीच्या सदस्यांना अटक केली, लोकप्रतिनिधींना स्थानबद्ध केलं, तसंच महाराष्ट्रातून कर्नाटकात जाणाऱ्या मराठी भाषिकांनाही कर्नाटकात प्रवेशबंदी केली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे उपनेते संजय पवार यांच्यासह इतर कार्यकर्त्यांना कर्नाटक पोलिसांनी काल बेळगावात जाण्यास मज्जाव केला.
कर्नाटक विधानसभेत लावलेली स्वातंत्र्यवीर सावरकरांची प्रतिमा हटवण्याचा निर्णयही सिद्धरामय्या सरकारने घेतला असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

केंद्रीय पंचायत राज मंत्रालयानं २०२२-२३ या वर्षाकरता राष्ट्रीय पंचायत पुरस्कारांसाठी देशभरातून विविध श्रेणींमध्ये ४५ पुरस्कार विजेत्यांची निवड केली आहे. त्यात महाराष्ट्राला सहा पुरस्कार मिळाले आहेत. उद्या बुधवारी नवी दिल्लीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

****

येत्या १३ आणि १४ डिसेंबरच्या रात्री आकाशात पूर्व दिशेला उल्का वर्षाव होताना दिसेल. याला जेमिनिड्चा उल्का वर्षाव म्हणतात. हा उल्का वर्षाव खगोलप्रेमी आणि अभ्यासकांना साध्या डोळ्यांनी पाहता येणार असल्याची माहिती खगोल अभ्यासकांनी दिली आहे.

****

राज्य सरकारने सुरु केलेल्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेच्या छाननीबाबतचं वृत्त निराधार असल्याचं, महिला आणि बालकल्याण विभागाच्या

माजी मंत्री आदिती तटकरे यांनी स्पष्ट केलं आहे. त्या काल विधान भवन परिसरात वार्ताहरांशी बोलत होत्या. याबाबत कोणीही संभ्रम पसरवू नये, असं आवाहन तटकरे यांनी केलं. त्या म्हणाल्या...

***अशा पद्धतीचा कुठेही निर्णय किंवा अशा पद्धतीची कुठेही चर्चा ही शासन स्तरावर झालेली नाही माझ्या माहितीनुसार. त्याच्यामुळे कुठलीही स्क्रुटीनी किंवा फेरचौकशी किंवा फेरतपासणी असा आदेश काही शासनाने काढलेला नाही. त्यामुळे विनाकारण गैरसमज कुणीही त्याबाबतीतला करू नये. ज्या पद्धतीनं ही योजना राबवली जात आहे, महिलांना लाभ मिळत आहे, त्यामुळे अधिकाधिक प्रभावी पद्धतीने ही लाडकी बहीण योजना पुढे सुद्धा राबवली जाणार आहे.***

****

मराठवाडा साहित्य परिषदेच्या अंबाजोगाई शाखेच्या वतीने येत्या १४ आणि १५ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय ११ व्या अंबाजोगाई साहित्य संमेलनाची तयारी पूर्ण झाली आहे. स्वागताध्यक्ष सुदर्शन रापतवार यांनी काल बीड इथं पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. संमेलनाची कार्यक्रम पत्रिका निश्चित झाली असल्याचं त्यांनी सांगितलं.

****

सैनिकांच्या बलिदानामुळेच आपण सुरक्षित असून माजी सैनिकांच्या समस्या सोडवण्यासाठी सदैव कटिबद्ध असल्याचं हिंगोलीचे जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी म्हटलं आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात काल सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनास प्रारंभ करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

****

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या ४२ व्या वर्धापन दिनानिमिताने विविध कार्यक्रम घेण्यात येत आहेत. काल महापालिकेच्या मुख्यालयात रक्तदान शिबिर घेण्यात आलं. ३६ अधिकारी- कर्मचाऱ्यांनी या शिबिरात सहभाग नोंदवत रक्तदान केलं. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रूग्णालयाच्या रक्तपेढीच्या वतीनं रक्त संकलन करण्यात आलं.

****

जालना शहर महानगरपालिकेनं काल शहरातल्या बसस्थानक परिसरात मुख्य रस्त्यावर आलेली २० अतिक्रमणं हटवली. शहरात गेल्या दोन दिवसांपासून हाती

घेण्यात आलेली ही अतिक्रमण हटाव मोहीम यापुढेही सुरू राहणार असल्याचं मनपा आयुक्त संतोष खांडेकर यांनी सांगितलं.

****

मुंबईत कुर्ला इथं आंबेडकर नगर परिसरात बेस्ट बसने अनेक वाहनांना धडक देऊन झालेल्या भीषण अपघातात तीन जण ठार झाले असून, किमान वीस जण जखमी झाले आहेत. आंबेडकर नगर परिसरात रात्रीच्या सुमारास हा अपघात झाला.

****